# महाराष्ट्र शासन

क्रमांक:-संकिर्ण०३१९/प्र.क्र.३२/१३स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ सप्टेंबर २०१९

**<u>संदर्भ</u>**- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कक
२) समक्रमांक दि.७/०९/२०१९ रोजीचे आदेश.
३) भारत निवडणूक आयोगाचे दि.२१/०९/२०१९ रोजीची प्रेस नोट.

**आदेश :-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली असुन उक्त कलमाच्या उपकलम (१) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या सार्वत्रिक निवडणुका, नैमित्तिक पद व समिती सदस्यांच्या पदाधिकारी यांच्या निवडणूका निवडणूक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणामार्फत घेण्यात येतात. त्यानूसार सद्यस्थितीत राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणामार्फत प्रक्रिया सुरु आहेत; आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कक नुसार टंचाई, अवर्षण, पूर, आग, व इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा किंवा विधानसभा निवडणूक कार्यक्रम हा कोणत्याही संस्थेच्या किंवा वर्गाच्या निवडणूकीच्या वेळेत येत असल्यामुळे, राज्य शासनाच्या मते कोणतीही संस्था किंवा संस्थेचा वर्ग यांच्या निवडणूका घेणे लोकहिताचे नसेल, अशा कारणास्तव सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थां वर्गाच्या निवडणूका एका वेळी सहा महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या कालवधीपर्यंत ढकलण्याचे शासनास अधिकार प्राप्त आहे; आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीकरीता भारत निर्वाचन आयोगाने विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केलेला असून दि.२१/०९/२०१९ पासून आदर्श आचारसंहिता सुरु झालेली असल्याने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कक मधील तरतूदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका काही काळासाठी पुढे ढकलणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री झाली आहे; आणि

ज्याअर्थी, कलम ७३ कब चे पोट-कलम ११ मधील दुसऱ्या परंतुकान्वये गृहनिर्माण सहकारी संस्थांना त्यांच्या समितीच्या निवडणूका घेण्याबाबतचे अधिकार दिलेले आहेत. मात्र सदर दिलेल्या अधिकारानुसार निवडणूका घेण्याबाबतचे नियम अंतिम होण्यास काही कालावधी लागणार असल्याने दि. ७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या आदेशान्वये २५० पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समितीच्या

निवडणूका दि.३१/१२/२०१९ पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय झाला असून अशा गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलण्याबाबतची स्थिती सदर आदेशात नमूद केल्याप्रमाणे राहील ; आणि

ज्याअर्थी, कलम ७३ कब चे पोट-कलम ११ मधील दुसऱ्या परंतुकान्वये २५० पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समितीच्या निवडणूका घेण्याबाबत दिलेल्या अधिकारात गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका दि.०७/०९/२०१९ रोजीच्या आदेशान्वये दि.३१/१२/२०१९ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याने, महाराष्ट्र विधानसभेच्या आचारसंहितेमुळे उर्वरित संस्थांच्या निवडणूकांबाबत निर्णय घेणे आवश्यक होते.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कक अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीकरीता भारत निर्वाचन आयोगाने विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केलेला असून, दि.२१/०९/२०१९ पासून आदर्श आचारसंहिता सुरु झालेली आहे, ही बाब विचारात घेऊन ज्या सहकारी संस्थांचा नामनिर्देशनाचा टप्पा सुरु झाला आहे किंवा ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने निश्चित आदेश दिले आहेत, अशा सहकारी संस्था वगळुन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये नमूद केलेल्या राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका, तसेच सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा निवडणुका या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०९२५११३७११९९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

Chaudhary Anil Jayaram

Digitally signed by Chaudhary Anil Jayaram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, cn=Chaudhary Anil Jayaram
Date: 2019.09.25 11:38:39 +05'30'

**(अनिल ज.चौधरी)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे.
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकूल, शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
८. सर्व जिल्हा उपनिबंधक सर्व सहकारी संस्था
९. निवडनस्ती-१३स